

'रंग डारो ना श्याम' या होळी-नृत्यात सुनिता बगाले, भाग्यलक्ष्मी मोघे, गौरी काळे व सुहासिनी ओक.

# कथ्थक साधना केंद्राचा तिसरा वार्षिकोत्सव

**सौ.** ललिता हरदास यांनी चालविलेल्या कथ्थक नृत्याच्या वर्गाचे वार्षिक स्नेहसंमेलन माधव नगरातील हॉलमध्ये सोमवार दि. २४ ला सायंकाळी पार पडले. त्यात सर्व वर्गांच्या विद्यार्थिनींचा सहभाग होता. डॉ. नारायणराव मंगरूळकर यांच्या अध्यक्षतेखाली, कु. काजल शर्मा यांच्या हस्ते नटराजाच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. कथ्थक साधना केंद्राचा अहवाल, उद्देश आणि संपूर्ण निवेदन सौ. हरदास यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात कु. क्षितिज व क्षमा हरदास यांच्या गणेशवंदनाने झाली. गणेश परण, शिवपरण व विष्णुस्तुती ह्या नृत्यानंतर ह्या दोघांनी दीपनृत्य– शिवपंचाक्षरस्तोत्र सुलताल व चौतालळात अतिशय कौशल्याने व सहजतेने सादर केले. हे स्तोत्र भूपाळी व यमन रागातून सुश्राव्य झाले. नंतर कथ्थक नृत्याचं प्रदर्शन प्रारंभिक प्रथमा, मध्यमा वर्गातील विद्यार्थिनींनी क्रमाक्रमाने केले. हस्तसंचालन, पदसंचालन, पुष्पांजलि, थाट, आमद, तोडे, तुकडे, परण, ततकार या नृत्यप्रकारांतून अभिनयाचं बीज अंकुरित कसे केले ते दर्शविले. या माध्यमांचं प्रस्तुतीकरण त्रितालात केले. गतभाव न पानिहारि हे कथ्थक नृत्याचे महत्त्वाचे प्रकार तर माखनचोरी हा कथ्थक नृत्य कलावंताचा आवडता प्रकार सादर करण्यात आला.

द्रौपदीवस्त्रहरण हेही परिणामकारक ठरले. सर्वांत शेवटी 'कभी कभी' ह्या शीर्षकाखाली १) सीताहरण के समय जटाय, २) सेतू बांधने वक्त वानरसेना तथा छोटीसी गिलहरी, ३) लक्ष्मण मूर्छित होने पर हनुमान का पर्वत उडाना इ. पौराणिक प्रसंगांतून कधी कधी परमेश्वराला सुद्धा कसे भक्तांचे साहय होते हे दाखवून देण्यात आले.

नायिकाभेद हा विषय साहित्यिक आणि गीतकार व नृत्यांगनांना सुद्धा प्रिय आहे. त्यात अभिनयाचा विशेषतः सात्विक भावांचा आविष्कार प्रभावी ठरला. आलसी सूर्यफूल ही लहान मुलांची नृत्यनाटिका आकर्षक वाटली. शेवटी 'रंग डारो ना श्याम' हा भारतीयांच्या आवडत्या सणावर आधारित होरी नृत्यप्रकार सादर करून कार्यक्रम संपला.

क्षितिज व क्षमा हरदास यांच्याशिवाय गौरी काळे, सुनीता बगाले, भाग्यलक्ष्मी मोघे, सुहासिनी ओक, नीलम मिस्त्री, सुनित्रा जोशी, प्राजक्ता टिकले, प्रफुल्ल खोलकुटे, मोनिका बोरीकर, कोमली राव, रश्मी गंगाणे, मीना खरबंदा, वैशाली पिपरकर, पल्लवी सालंकर, मंजिरी दाणी इ. मुलींनी हे सर्व नृत्य प्रकार अतिशय सहजसुंदररीत्या करून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. मंगरूळकरांनी प्रमुख अतिथी कु. काजल शर्मा यांना व त्यांच्या मातोश्रींना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. काजल शर्मा यांच्या हस्ते सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना प्रशस्तिपत्रे देण्यात आली. साथीदारांना संस्थेतर्फे अल्प पुरस्कार देण्यात आले. श्री. नारायणराव मंगरूळकरांच्या भाषणानंतर कु. काजल शर्मा यांनी नागपूरकरांच्या नृत्यशिबिराच्या प्रतिसादाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या व संस्थेबद्दल गौरवोद्गार काढले.

—सौ. मोहना मार्डीकर

